स्थापना वर्ष २००१

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे

# लालबहादूर शास्त्री कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

आष्टी ता.परतूर जि.जालना

-: संलग्नीत :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद



# माहिती पुस्तिका

२०१७-२०१८

# -: आमचे श्रध्दास्थान :-



मा.स्व.बाबासाहेब (भाऊ) आकात

# -: आमचे प्रेरणास्थान :-



## श्रीमती आशाबाई बाबासाहेब आकात

अध्यक्षा

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर
ता.परतूर जि.जालना



उपाध्यक्ष

कुणाल बााबासाहेब आकात

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ,
परतूर ता.परतूर जि.जालना



सचिव

कपिल (भैय्या) बाबासाहेब आकात

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ,
परतूर ता.परतूर जि.जालना

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर संचलित

# लालबहादूर शास्त्री कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता.परतूर जि.जालना

## स्थानिक नियामक मंडळ

## २०१७ - २०१८

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती आशाबाई बाबासाहेब आकात | - | अध्यक्षा |
| २. | श्री राजेंद्र बाबाराव थिटे | - | सहसचिव |
| ३. | श्री कपील बाबासाहेब आकात | - | सदस्य |
| ४. | श्री कुणाल बाबासाहेब आकात | - | सदस्य |
| ५. | श्री कठाळु रंगनाथ काटे | - | सदस्य |
| ६. | प्रा. श्री.एन.आर. सोळंके | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ७. | प्रा. बि.यू. घुंगरड | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ८. | श्री. एस.एस. गवळी (मुख्य लिपीक) | - | सदस्य (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) |
| ९. | प्रभारी प्राचार्य डॉ. दत्ता वाघमारे | - | सदस्य, सचिव |

# प्रास्ताविक

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर जि.जालना संचलीत लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, आष्टी ची सुरूवात २००१ मध्ये झाली. आजच्या सामाजिक जीवनात नैतिक मुल्यांचे महत्व अधिक आहे. त्सासाठी काही तरी करावे या प्रेरणेने संस्थेने हे वरिष्ठ महाविद्यालय सुरू केलेले आहे. "असे जे आपणांपासी, असो वित्त वा विद्या । सदा ते देतची जावे" या उक्तीप्रमाणे आमची संस्था स्थापनेपासुनच विद्यादान करत आलेली आहे. आमचे कुशल नेतृत्व श्रीमती आशाबाई बाबासाहेब आकात यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था सातत्याने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. आमचे महाविद्यालय संस्कारक्षम शिक्षण देण्यासाठी आणि सामाजिक संबंध समाजसेवेच्या माध्यमातून राबविण्यासाठी तत्पर आहे.

या महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी येणारा विद्यार्थी हा स्थानीक किंवा तालूक्यातील खेड्या पाड्यातील, तांड्यावरचा आहे, याची आम्हाल जाणीव आहे. या महाविद्यालयाचे केंद्रबिंदु विद्यार्थीच आहेत. त्यांचा सर्वांगीण विकासातच राष्ट्रहित आहे व ते साध्य करणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहून पुस्तकाच्या चौकटीत अडकवून न ठेवता विविध उपक्रम राबवून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. त्यासाठी आमच्या महाविद्यालयात क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन केल्या जाते, बुध्दीमत्ता आणि सृजनशीलतेच्या विकासासाठी महाविद्यालयात वक्तृत्व,वाद-विवाद, निबंध इ. स्पर्धाचे आयोजन करून सौंदर्य दृष्टीकोन व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यसाठी दरवर्षी शैक्षणिक सहजीचे आयोजन करण्यात येते. व्यक्तीमत्व विकासांतर्गत विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतीक व्यासपीठ सतत निर्माण करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो.

कला, वाणिज्य व विज्ञान हे तीनही शाखांचे पदवी पर्यंतचे शिक्षण या महाविद्यालयातून दिले जाते. एकंदरीत आमच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून त्यांना आजच्या विज्ञान युगात वैज्ञानिक दृष्टीचे पंख देऊन आकाशात गरूडझेप घेण्यासाठी सक्षम बनविणे, हाच आमचा उद्देश........ हेच आमुचे ध्येय......!

आपल्या अंगी असलेल्या विविध गुप्त गुणांचा शारीरिक,बौध्दिक आणि मानसिक विकास या महाविद्यालयात व्हावा तसेच महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडावी असे आपल्याकडून अपेक्षीत आहे.

या महाविद्यालयात स्वागत करत असतांना वरील अपेक्षा पूर्ण होतील याची मी खात्री बाळगतो.

**डॉ.दत्ता वाघमारे**
प्र. प्राचार्य

प्रति,

**मा.प्राचार्य साहेब,**

लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय,आष्टी

ता.परतूर जि.जालना

# हमीपत्र

महोदय,

माझा पाल्य

कुमारी........................................................................................................................

आपल्या महाविद्यालयात बी.ए./बी.एस्सी.- प्रथम/द्वितीय/तृतीय/वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो, कृपया त्यास प्रवेश द्यावा. माझा पाल्य नियमित वर्गात उपस्थित राहिल व महाविद्यालय प्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करने त्यसा बंधनकारक असेल.

माझा पाल्य नियमित वर्गात उपस्थित न राहिल्यास किंवा त्याची उपस्थिती ७५% न राहिल्यास त्याचे परिक्षेचे आवेदन पत्र रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार आपणास राहिल.

तसेच महाविद्यालयात गैरवर्तन किंवा नियमाचे पालन न केल्यास त्याचा प्रवेश कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा अधिकार आपणास राहिल. अशी मी या हमीपत्राद्वारे देत आहे.

**आपला विश्वासू**

**विद्यार्थ्याची सही**

विद्यार्थ्याचे नांव-------------

वर्ग--------------------

**पालकाची सही**

पालकाचे नांव ----------------

पत्ता------------------------

----------------------------

----------------------------

**भ्रमणध्वनी नं.**..............................

## कार्य - ध्येय - उद्दिष्टे

**कार्य :-**

* ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार
* विद्यार्थ्यात जीवन मुल्यांचे संवर्धन व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास.

**ध्येय :-**

* ग्रामीण युवक-युवतींना व्यवसाय प्राप्ती सक्षम बनविणे.
* ग्रामीण युवकांना जबाबदार नागरीक बनविणे.
* उत्कृष्ट विद्यार्थ्यांना उत्तम भवितव्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.

**उद्दिष्टे :-**

* विद्यार्थी वाणी व वर्तनाने स्वच्छ होण्यास मदत करणे.
* विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रभिमान व देशभक्ती रूजविणे.
* विद्यार्थ्यात नेतृत्वगुण बिंबविणे.
* स्व विकास व सहकार्य विद्यार्थ्यांच्या अंगी बिंबविणे.
* वेळेचे भान व महत्व जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना सवय जडविणे.
* विद्यार्थ्यात सक्रियता व विचार पगल्भता बिंबविणे.
* विद्यार्थ्यात निःस्वार्थ सेवाभावाची वृत्ती वाढीस लावणे.
* प्रतिभा जागृती व कार्य निष्ठा.

## महाविद्यालयीन प्रवेशासंबंधी नियम

१. प्रत्येक विषयाच्या जागा मर्यादित असल्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

२. मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या धोरणानुसार आरक्षण राहील.

३. महाविद्यालयात भरलेली फीस कोणत्याही कारणास्तव परत दिली जाणार नाही.

४. कार्यालयात दिलेली कागदपत्रे त्यासंबंधीचे काम पूर्ण झाल्याशिवाय परत दिली जात नाहीत म्हणून विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्राच्या जास्तीत जास्त झेरॉक्स प्रतीजवळ ठेवाव्यात.

५. मूळ कागदपत्रे कार्यालयात सादर केल्यावर त्याबद्दल पावती घ्यावी.

६. मायग्रेशन, पासींग व इतर कागदपत्रे ठरवलेल्या वेळेच्या आत सादर करावी लागतील. वेळेवर कागदपत्रे सादर न केल्यास प्रवेश रद्द होईल.

७. कोणत्याही कारणासाठी डुप्लीकेट टी.सी. दिली जात नाही.

# वरीष्ठ महाविद्यालय प्रवेशासंबंधीचे नियम

बी.ए., बी.एस्सी. प्रवेशाकरिता खालील नियम व अटी आवश्यक आहेत.

१. बी.ए./बी.एस्सी या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या निर्णयानुसार सेमीस्टर पद्धत (Semister System) लागु केली आहे.

२. एच.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रे ५ सत्यप्रतीसह जोडणे आवश्यक आहे.

- शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (Transfer Certificate)
- गुणपत्रक (Mark Memo)
- पासपोर्ट साईज फोटो (Passport Size Photo)
- जातीचे प्रमाणपत्र (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
  (Caste Certificate of Backward Class Students)
- योग्यता प्रमाणपत्र (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी)
  (Eligibility Certificate for Student from Other State)
- स्थलांतर प्रमाणपत्र (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी)
  (Migration Certificate for Student from Other State)
- अपत्य प्रमाणपत्र (Progeny Certificate)
- उत्पन्नाचा दाखला (Income Certificate)
- शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक (शिष्यवृत्तीधारकांसाठी)
  (Schlorship Sanction No. for Scholarship holders.)

# वरिष्ठ महाविद्यालय कार्यक्रम (पदवी अभ्यासक्रम)

## बी.ए.प्रथम वर्ष

| | | |
|---|---|---|
| प्रवेश मर्यादा | : | १२० |
| अनिवार्य | : | इंग्रजी, पर्यावरणशास्त्र व संगणकशास्त्र |
| द्वितीय भाषा | : | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | १. मराठी २. हिंदी ३. राज्यशास्त्र ४. अर्थशास्त्र ५. इतिहास ६. समाजशास्त्र ७. इंग्रजी |

टिप :- १) उपरोक्त ऐच्छिक विषयापैकी कोणतेही तीन विषय निवडावे लागतील.

२) बी.ए.द्वितीय वर्षासाठी प्रथम वर्षात निवडलेले विषयच अभ्यासावे लागतील.

३) बी.ए.तृतीय वर्षासाठी ऐच्छिक विषयातून एक विषय मुख्य (Main) म्हणून निवडावा लागेल. मुख्य विषयाचे प्रत्येक सेमिस्टरला चार पेपर राहतील. तसेच ऐच्छिक विषयातील इतर दोन विषय सहाय्यक विषय (Subsidery Subjects) म्हणून राहतील. सहाय्यक विषयाचे प्रत्येक सेमिस्टरला दोन पेपर राहतील.

## बी.एस्सी प्रथम वर्ष

| | | |
|---|---|---|
| प्रवेश मर्यादा | : | १२० |
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी, पर्यावरणशास्त्र व संगणकशास्त्र |
| द्वितीय भाषा | : | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | खालीलपैकी कोणत्याही एका ग्रुपची निवड करता येईल. |
| Group - I | : | Chemidtry, Botany, Zoology |

टिप :- प्रथम वर्षासाठी निवडलेले ऐच्छिक विषय द्वितीय व तृतीय वर्षासाठी अभ्यासावे लागतील.

शैक्षणिक संस्था विनिमय प्राधिकरणाकडून २००९-१० निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात येईल.

## वरिष्ठ महाविद्यालय शुल्क तक्ता

| अ.क्र. | विवरण | बी.ए. बी.एस्सी.प्र.वर्ष | बी.ए. बी.एस्सी.द्वि.वर्ष | बी.ए. बी.एस्सी.तृ.वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नोंदणी शुल्क | २५.०० | २५.०० | २५.०० |
| २. | प्रवेश शुल्क | २५.०० | २५.०० | २५.०० |
| ३. | पात्रता शुल्क | ५०.०० | -- | -- |
| ४. | शिकवणी शुल्क | १६००.०० | १६००.०० | १६००.०० |
| ५. | ग्रंथालय शुल्क | ५०.०० | ५०.०० | ५०.०० |
| ६. | ओळखपत्र शुल्क | २०.०० | २०.०० | २०.०० |
| ७. | वैद्यकीय तपासणी शुल्क | ०५.०० | ०५.०० | ०५.०० |
| ८. | क्रिडा शुल्क | २५.०० | २५.०० | २५.०० |
| ९. | परीक्षा शुल्क | -- | -- | -- |
| १०. | स्नेहसंमेलन शुल्क | १००.०० | १००.०० | १००.०० |
| ११. | विद्यार्थी कल्याणनिधी | १०.०० | १०.०० | १०.०० |
| १२. | ग्रंथालय ठेव | ५०.०० | ५०.०० | ५०.०० |
| १३. | विद्यार्थी विमा | ०५.०० | ०५.०० | ०५.०० |
| १४. | व्यवस्थापन शुल्क | -- | -- | -- |
| १५. | प्रयोगशाळा शुल्क | २००.०० | २००.०० | २००.०० |
| १६. | विद्यापीठ क्रिडा शुल्क | ५०.०० | ५०.०० | ५०.०० |
| १७. | आपत्कालीन निधी | १०.०० | -- | -- |
| १८. | अश्वमेध | ६४.०० | ६४.०० | ६४.०० |
| १९. | युवक महोत्सव | -- | -- | -- |
| २०. | Student Aid Fund | २०.०० | २०.०० | २०.०० |
| २१. | पर्यावरण | -- | १५०.०० | -- |
| | E-mail | ५०.०० | -- | -- |

नोट :डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नियमानुसार नविन सुधारीता फिस आकारली जाईल. ती संबंधीत विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहील.

शुल्कासंबंधी नियम : विद्यार्थ्यांचे सर्व अध्ययन शुल्क व इतर शुल्क भरल्यानंतरच त्याचा प्रवेश कायम स्वरूपाचा समजला जाईल.

# शिष्यवृत्ती, आर्थिक मदत आणि पारितोषिक

गुणवत्ताधारक आणि पात्र विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्यांची सोय उपलब्ध करून दिली जाते.

| अ. क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | गुणांची किमान टक्केवारी (१० वी, १२ वी) | उत्पन्नाची मर्यादा | लागणारी कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | अपंग शिष्यवृत्ती | ४०% सर्व अपंगासाठी | १५०००/- | १. अपंगत्व दर्शविणारे सिव्हील सर्वजनचे प्रमाणपत्र (अपंगत्व ४०% पेक्षा जास्त)<br>२. टि.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>३. उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार) |
| २. | सैन्यातील जवानांच्या मुलांना शैक्षणिक मदत | सर्व वर्गासाठी | | १. टि.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>२. जिल्हा सैनिक बोर्डाचे योग्यता प्रमाणपत्र |
| ३. | मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती | | ३८२२०/- ते ५०९२०/- | १. टि.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>२. तहसिलदाराचे जातीचे प्रमाणपत्र<br>३. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (मुळ प्रमाणपत्र)<br>४. वडिल वारल्याचे प्रमाणपत्र (वडिल हयात नसतील तर)<br>५. जिल्हा बदली प्रमाणपत्र (प्रथम वर्षासाठी)<br>६. शिष्यवृत्ती आदेश क्रमांक<br>७. १०/- रूपयांच्या बाँडवर प्रतिज्ञापत्र |

| अ. क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | गुणांची किमान टक्केवारी (१० वी, १२ वी) | उत्पन्नाची मर्यादा | लागणारी कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| | | | | (शिष्यवृत्ती खंडीत झालेली असेल तर)<br>१. जातीचे प्रमाणपत्र सत्यप्रत<br>२. मार्कमेमोची सत्यप्रत<br>३. जिल्हा बदली प्रमाणपत्र (इतर जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी)<br>४. मागील मंजुरी आदेश क्रमांक (दुसऱ्या महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यासाठी) |
| ४. | जी.ओ.आय. | १. मागासवर्गीय पुनःप्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास<br>२. अधिक उत्पन्न असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी | | १. जी.ओ.आय. फ्रिशिपचा फॉर्म भरणे<br>२. मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>३. जातीचे प्रमाणपत्र<br>४. मागील मंजुरी आदेश क्रमांक<br>५. तहसिलदाराचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र किंवा वडील किंवा नौकरी करीत असतील तर त्यांचे वेतन प्रमाणपत्र |

टिप :- वरील शिष्यवृत्तांसाठी या कार्यालयामार्फत मंजूरीसाठी शिफारस केली जाते. संबंधित विभागाकडून गुणानुक्रमे मंजुरी दिली जाते व त्यांनतर विद्यार्थ्यांना शिष्वृत्तीचे वाटप केले जाते.

शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे शिष्यवृत्ती मंजुर झाली असे समजता येणार नाही. गुणानुक्रमे शिष्यवृत्या मंजुर होतात. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जामाती व अनुसूचित जमाती इतर मागास इत्यादी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळते. ही शिष्यवृत्ती बि.ए./बि.एस्सी. पर्यंत मिळते. प्रत्येक वर्षी शिष्यवृत्तीचा फॉर्म भरावा लागतो. काही कारणांमुळे जर शिष्यवृत्ती नामंजूर झाली तर दरमहा वाटप केलेली शिष्यवृत्ती रक्कम परत करावी लागते.

शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे.

# विद्यार्थी संवाद

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यार्थी संसदेची रचना केली जाते. प्रत्येक वर्गातून एक वर्ग प्रतिनिधी गुणवत्तेनुसार नियुक्त केला जातो.

त्याशिवाय

अ) एन.एस.एस. ब) सांस्कृतीक कार्यक्रम क) खेळ या क्षेत्रातुन विद्यार्थ्यांची मागील वर्षीची गुणवत्ता विचारात घेऊन नियुक्ती केली जाते.

विद्यार्थीनीमधुन दोन प्रतिनिधींची गुणवत्तेनुसार नियुक्ती केली जाते. सर्व प्रतिनिधी आपल्यामुधन एकच सचिव म्हणून निवड करतात. एका शिक्षकाची नेमणुक-कार्यकारी अध्यक्ष म्हणून केली जाते. प्राचार्य हे विद्यार्थी संसदेचे पदस्थि अध्यक्ष असतात, ही संसद कनिष्ठ महाविद्यालयात संसदेसोबत एकत्रीतपणे कार्य करते.

## राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme)

विद्यार्थी संख्या : वरिष्ठ महाविद्यालय - १५०

महाविद्यालयात एन.एस.एस. साठी स्वतंत्र युनिट कार्य करते. ज्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्य करण्यामध्ये रस आहे आणि जे स्वेच्छेने एन.एस.एस. मध्ये प्रवेश घेऊन इच्छितात अशा विद्यार्थ्यांना एन.एस.एस. युनिटमध्ये सामावून घेतले जाते.

ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक सुधारणा घडवून आणणे, स्वावलंबी बनविणे हा मुख्य उद्देश एन.एस.एस. युनिटचा आहे.

नवराष्ट्र उभारणीमध्ये एन.एस.एस. च्या विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वाचा ठरतो. उदा : रक्तदान, श्रमदान, स्वच्छता भियान, जनजागृती मोहिम इत्यादी, प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांस बी.एड साठी ५ गुण वाढ मिळते.

## क्रिडा (Sports)

महाविद्यालयाच्या शारिरीक शिक्षण विभागांतर्गत व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅटमिंटन, टेबल टेनिस, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बास्केट बॉल शटल आणि ॲथलेटीक्स या खेळांच्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

राज्य व राष्ट्रीय पातळीवर महाविद्यालयातील मुलांना नोंदवून उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

_ *** _

# शिस्त आणि आचारसंहिता

**शिस्त –**

१. स्वयंशिस्त हीच सर्वोत्तम शिस्त होय. महाविद्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन नियम व अटीचे पालन करणे आवश्यक आहे.

२. महाविद्यालयात किंवा परिसरात प्रशासनाच्या परवानगीशिवाय कोणते कृती / कार्यक्रम करण्यास मज्जाव राहील. कोणताही राजकीय किंवा अन्य स्वरूपाची बाह्य दबाव महाविद्यालयावर आणल्यास शिस्तीचे उल्लंघन समजले जाईल.

३. महाराष्ट्र सरकार कायदा आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करणारे विद्यार्थी शिक्षेस पात्र ठरतील.

**आचार संहिता –**

१. महाविद्यालयात आणि महाविद्यालयातील परिसरात विद्यार्थ्यांकडे वैध ओळखपत्र असणे आवश्यक आहे आणि महाविद्यालयातील स्टाफने मागताक्षणी ते दाखवणे त्यास बंधनकारक राहील. प्रवेश घेतल्यापासून एक महिण्याच्या कालावधीतच विद्यार्थ्यांनी ओळखपत्रावर प्राचार्य व ग्रंथपाल यांची स्वाक्षरी द्यावी.

२. वर्गामध्ये तास चालू असतांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आजू बाजूला रेंगाळत थांबू नये.

३. सर्व विद्यार्थ्यांनी आपली सौजन्यशील वर्तणुक आणि गणवेश याकडे कटाक्ष ठेवावा.

४. शैक्षणिक, व्यक्तीगत अडचणी असतील तर त्या अडचणी विभागप्रमुख आणि उप प्राचार्यांना सांगाव्यात ते त्या अडचणी सोडण्यास मदत करतील.

५. विद्यार्थ्यांनी बाहेरील अनोळखी व्यक्तींना महाविद्यालयात सोबत आणू नये.

६. विद्यार्थ्यांनी प्राचार्यांना परवानगी शिवाय इतर विद्यार्थी किंवा बाहेरील कोणाही व्यक्तीकडून कसलाही निधी गोळा करू नये.

७. विद्यार्थ्यांनी प्राचार्यांना लिखीत परवानगी शिवाय कोणत्याही शैक्षणिक सहल मोहिम,भेट, वनभोजन इत्यादी सारखे कार्यक्रम आयोजित करू नये.

८. नियमबाह्य वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यावर कारवाई अधिकार प्राचार्यांना असतील. त्यांना निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

## गैरवर्तन -

खालील कृत्यांचा समावेश गैरवर्तनात होतो.

- पान, तंबाखू, गुटखा, मावा, मटेरीयल इ.खाणे
- धुम्रपान करणे, भिंतीवर थुंकणे.
- ओळखपत्र व गणवेषाशिवाय महाविद्यालयात येणे.
- गटबाजी करणे, भांडण करणे, गोंधळ धालणे.
- विद्यार्थिनीची छेडछाड करणे.
- महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर, बोर्डावर असभ्य मजकूर लिहीणे व चित्र काढणे.
- वर्ग चालू असतांना व्हरांड्यांत रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे.
- प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची उध्दट वर्तन करणे व आज्ञा भंग करणे.

उपरोक्त गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम ताकीद दिली जाते,नंतर दंड केला जातो, शैक्षणिक सवलती बंद केल्या जातात. परीक्षा फार्म भरला जात नाही. प्रवशे रद्द केला जातो आणि विशिष्ट प्रसंगी अशा विद्यार्थ्यावर पोलीस कारवाई केली जाते.

## सर्वसाधारण सुचना -

लालबहादूर शास्त्री कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विद्यार्थ्यांना घडवत असतांना त्यांच्या बौध्दिक आणि नैतिक पातळीत वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने आणि धैर्याने जीवनातील वास्तवाला तोंड देवू शकतील. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वतःला महाविद्यालयांचा घटक समजावे आणि स्वतःचे वर्तन या महाविद्यालयाच्या साजेसे ठेवावे व आत्म सन्मानाचे ठेवावे.

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी खालील पालन करणे आवश्यक आहे.**

१. वर्गामध्ये आणि सभागृहामध्ये दिलेल्या सूचना काळजीपूर्वक ऐकाव्या आणि त्यासुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

२. शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्याशी आदभावाने वागणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य असेल.

३. सुचना फलकावरील सुचना नियमित वाचाव्यात.

४. महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता राखावी.

५. तास चालू असतांना वर्गात किंवा वर्गाच्या आसपास समूहाने थांबू नये.

६. महाविद्यालयीन व्हरांड्यात रेंगाळण्यास परवानगी नाही.

७. महाविद्यालयीन परिसरात हळू बोलावे, दूर अंतरावरून ओरडू नये.

८. विद्यार्थ्यांनी तास नसलेया काळात ग्रंथालयाचा वापर करावा.

९. ग्रंथालयात मोठ्याने बालू नये, चर्चा करू नये. शांतता राखावी.

१०. विद्यार्थ्यांनी नियमबाह्य गट - तट बांधणेस परवानगी नाही.

११. महाविद्यालय परिसरातील भिंती, वर्गातील फलक, सुचनाफलक यावर अर्वाच्य लिखाण करणे व हस्तपत्रिका किंवा जाहिराती चिटकविणेस सक्त मनाई आहे.

# कार्यक्रम संचालन

| | | | |
|---|---|---|---|
| * | व्याख्यान पध्दती | Lecturer Method |
| * | वर्गपाठ व गट चर्चा | Classroom Exercise & Group Discussion. |
| * | सेमीनार व कार्यशाळा | Seminar & Workshop |
| * | प्रात्यक्षिके | Practical |
| * | निमंत्रीत वक्ते व व्याख्याने | Guest Lecturer |
| * | शैक्षणिक सहली | Educational Tours |
| * | प्रकल्प पूर्ती | Project Work |

* **बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांना तीन वर्षाच्या काळात पर्यावरण या विषयाची परीक्षा देणे बंधनकारक आहे. या महाविद्यालयात या विषयाची परीक्षा वर्षातच घेतली जाते. त्याचे वेळापत्रक सूचना फलकावर लावले जाते.**
* **ज्यांना संगणकशास्त्र हा विषय अभ्यासक्रमात नाही अशा बी.ए. आणि बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांना तीन वर्षात एकदा या विषयाची परीक्षा देणे बंधनकारक आहे. त्याचे वेळापत्रक सुचना फलकावर लावले जाईल. जे विद्यार्थी महाविद्यालयात MS-CIT पास असतील त्यांना या परीक्षेतून सूट आहे.**

# लालबहादूर शास्त्री महाविद्यालय प्राध्यापक वृंद

## १) इंग्रजी विभाग

१. प्रा.डॉ.बि.एम.गोरे (पिएच.डी)

## २) मराठी विभाग

१. प्रा.ए.बी.आवचार (एम.फिल)

## ३) हिंदी विभाग

१. प्रा.एन.एस.खैरे

## ४) इतिहास विभाग

१. प्रा. बि.यु. घुंगरड

## ५) राज्यशास्त्र विभाग

१. प्रा.एन.आर.सोळंके (एम.फिल)

## ६) अर्थशास्त्र विभाग

१. प्रा.डॉ.डि.एम.वाघमारे (एम.फिल,पिएच.डी.)



श्री.डॉ. दत्ता वाघमारे

प्र.प्राचार्य

लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, आष्टी

ता.परतूर जि.जालना





बुक-पोस्ट

प्रति,

श्री./सौ. ____________________

______________________________

______________________________






प्राचार्य,

लालबहादूर शास्त्री कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी

ता.परतूर जि.जालना


Abhiruchi,Parbhani- 223356